**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारत २०४७ पूर्वीच देश सिकलसेल ॲनिमियाचं पूर्णपणे निर्मूलन करेल, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार

- नागपूरजवळ अंबाझरी इथे दहा हजार टनाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस यंत्राची संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते पायाभरणी

**आणि**

- विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेस्टच्या कर्मचाऱ्यांचा आजपासून बेमुदत संप सुरु

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय उद्दिष्टापूर्वीच देश सिकलसेल ॲनिमिया या आजाराचं पूर्णपणे निर्मूलन करेल, असं प्रतिपादन विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज मध्य प्रदेशात ओंकारेश्वर इथे आंतरराष्ट्रीय सिकलसेल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. आदिवासी समुदायांमध्ये या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांचां आवाहनही राष्ट्रपतींनी यावेळी केलं. 'राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन मोहिमे'अंतर्गत मध्य प्रदेश सरकारने मिळवलेल्या यशाबद्दल राष्ट्रपतींनी त्यांचं कौतुक केलं. कार्यक्रमादरम्यान, राष्ट्रपती मुर्मू यांनी 'राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन मोहीम-२०४७' अंतर्गत आयोजित एका विशेष प्रदर्शनाला भेट दिली.

यानंतर त्या ओडिशातील रायरंगपूर इथे विविध विकासकामांचं उद्घाटन करणार आहेत. यात एम्स भुवनेश्वर आयोजित वैद्यकीय शिबिर, खाणकामबाधित गावांसाठी नळाने पाणी पुरवठा करणारी योजना आणि एका विशेष सर्किट हाऊसचा समावेश आहे.

दौऱ्याच्या पुढच्या टप्प्यात, राष्ट्रपती मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २० जून रोजी ओडिशात मयूरभंज जिल्ह्यातील पहाडपूर गावाला भेट देतील. २१ जून रोजी, राष्ट्रपती जबलपूर येथील 'आंतरराष्ट्रीय योग दिन' सोहळ्यात सहभागी होतील आणि राणी दुर्गावती

विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. २२ जून रोजी त्या कुनो राष्ट्रीय उद्यानाला भेट देतील.

<><><><><>

फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांचा यशस्वी दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नवी दिल्लीत परतले आहेत. आगामी काळात भारत-फ्रान्स मैत्री अधिक दृढ होईल; परस्पर सहकार्य आणि फलनिष्पत्तीच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा ठरला असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. पॅरिस भेटीत काल प्रधानमंत्र्यांनी विवाटेक २०२६ परिषदेला संबोधित केलं. तसंच पॅरिस इथल्या भारतीय समुदायालाही संबोधित केलं. भारत नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येत आहे, असं सांगून जागतिक नवोन्मेषकांना भारतासमवेत काम करण्याचे आणि सर्वांसाठी योगदान देण्याचे आवाहन प्रधानमंत्र्यांनी व्हिवाटेक परिषदेत केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. देशभरात २०० ठिकाणी, प्रामुख्यानं औद्योगिक आणि रोजगार केंद्र असलेल्या भागात हा कार्यक्रम होणार आहे. प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देणं आणि संबंधित कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या औद्योगिक संस्थांनाही प्रोत्साहनपर अनुदान देणं, अशा दोन भागात ही योजना राबवली जाणार आहे. गेल्या वर्षी ऑगस्टपासून या योजनेअंतर्गत ६३ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना औपचारिक रोजगार क्षेत्रात आणलं गेलं असून, त्यापैकी जवळपास ३० टक्के महिला असल्याचं, कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सभागृहात या कार्यक्रमाच्या प्रसारणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री किसान सन्माननिधी योजनेचा 23व्या हप्त्याचं वितरण उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पश्चिम बंगालमध्ये हुगळी जिल्ह्यातल्या तारकेश्वर इथून करणार आहेत. या हप्त्यानंतर, फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू झालेल्या पीएम किसान योजनेतून शेतकऱ्यांना मिळालेल्या रक्कमेचा आकडा ४ कोटी ४६ लाखांचा टप्पा ओलांडेल.

पश्चिम बंगालमध्ये शेतीसंबंधी अनेक योजनांचा आरंभही उद्या प्रधानमंत्री करणार आहेत. यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना, पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना यांचा समावेश आहे. डिजिटल कृषी अंतर्गत ॲग्री स्टेक या योजनेचाही उद्या ते आरंभ करतील.

पुरुलिया, दार्जीलिंग, अलीपुरद्वार आणि झारग्राम या जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेचा आरंभही मोदी करणार आहेत. या निमित्ताने देशभरात पीएम किसान उत्सव दिवस हा विशेष कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमाला देशभरातून एक कोटी शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित राहतील असं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज नागपूरजवळ अंबाझरी इथल्या शस्त्र कारखान्यात दहा हजार टनाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस या यंत्राची पायाभरणी करण्यात आली. देशाच्या संरक्षण सामग्री उत्पादनासाठी ही एक्सट्रुजन प्रेस अत्यंत महत्त्वाची मानली जाते. संरक्षण क्षेत्राच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारं उच्च दर्जाचं ॲल्युमिनियम एक्सट्रुजन बनवण्याची क्षमता या प्रेसमुळे वाढणार असून यामुळे स्वदेशी उत्पादनाला चालना मिळेल, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबईची परिवहन सेवा असलेल्या बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी आज सकाळपासून बेमुदत संप सुरु केला आहे. मुंबई महानगर पालिकेच्या अर्थसंकल्पात बेस्ट च्या अर्थसंकल्प सामावून घ्यावा. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित आर्थिक लाभ तातडीनं देण्यात यावेत. सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी आदी मागण्यांसाठी बारा कर्मचारी संघटनाच्या वतीनं हा संप पुकारण्यात आला आहे. या संपामुळे मुंबईतल्या २७ बेस्ट डेपोमधून एकही बस बाहेर पडली नाही. या संपामुळे सकाळी आपापल्या कार्यालयाकडे निघालेल्या लाखो प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. बेस्टच्या संपामुळे टॅक्सी, रिक्षा आणि इतर वाहनांचा आधार घ्यावा लागला. बेस्ट संपामुळे मुंबईच्या मेट्रो सेवांवरही मोठा ताण आल्याचं दिसून आलं. बेस्ट उपक्रमाच्या २ हजार ७६६ बसेस पैकी केवळ ३८ बसेस रस्त्यावर धावत असून सहा ठिकाणी कामगारांनी बसेस वर दगडफेक केल्यामुळे बसेसचे नुकसान झाल्याची माहिती बेस्ट प्रशासनाने दिली आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बेस्ट मालमत्तेचं नुकसान आणि वाहतुकीत व्यत्यय आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

नीट यूजी फेरपरीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं एक अधिकृत व्हॉटसअप संपर्क वाहिनी सुरु केली आहे. परीक्षे संदर्भातली सर्व अधिकृत माहिती 7827980287 या व्हॉटसअप क्रमांकावर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. आपल्या व्हॉट्सअप वर परीक्षेसंबंधी कोणताही संदेश आल्यास ब्लू व्हेरिफिकेशन टिक आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे नाव असल्याची खात्री करुन घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे. नीट यूजीची फेरपरीक्षा येत्या रविवारी होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी २१ जूनच्या परीक्षेसाठी आपलं हॉल तिकीट या आधी डाऊनलोड केलं आहे. त्यांना पून्हा ते डाऊनलोड करण्याची गरज नसल्याचंही चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. ३ मे रोजीच्या परीक्षेसाठीचं डाऊनलोड केललं हॉलतिकीट या परीक्षेला चालणार नसल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मिझोरममध्ये मतदार याद्या सखोल पुर्नरिक्षणात सर्व राज्यांमध्ये आघाडी घेतली असून तब्बल ८ लाख ७५ हजार मतदारांच्या एसआयआर चं डिजीटलायजेशन पूर्ण झालं आहे. याद्वारे ९५ टक्के मतदारांचं पूर्नरिक्षण पूर्ण झालं आहे. मिझोरममधल्या ११ जिल्ह्यांमध्ये शंभर टक्के मतदाराचं डिजीटलायजेशन पूर्ण झाल्याची माहिती राज्याचे संयुक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये सुरक्षा दलाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे राज्यात मोठी शोधमोहिम राबवण्यात आली असून या दरम्यान विविध भूमिगत संघटनांच्या दहा सदस्यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. या कारवाईत अपहरण झालेल्या एका व्यक्तीचीही सुटका करण्यात आली आहे. इन्फाळ पूर्व जिल्ह्यात जागोजागी हातबॉम्ब पेरणाऱ्या केसीपी या संघटनेच्या चार सदस्यांनाही अटक करण्यात आली.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत, मेक्सिकोने आज ग्वादालहारा स्टेडियमवर दक्षिण कोरियाला १-० ने पराभूत करून बाद फेरीच्या ३२ संघांच्या फेरीत पात्र ठरणारा पहिला देश बनण्याचा मान मिळवला. मेक्सकोने ५० व्या मिनिटाला निर्णायक गोल केला. याआधी काल

रात्री झालेल्या ब गटातील सामन्यात कॅनडाने कतारचा ६-० ने पराभव केला. तर, अ गटात चेक प्रजासत्ताक आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात १-१ असा सामना बरोबरीत सुटला.

**//<><><><><>//**